महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
Tel:(0253) 2539171 ☎ Student Helpline:0253-2539111/6659111/100
Website: www.muhs.ac.in, e-mail: sw@muhs.ac.in

डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ
एम.बी.बी.एस, एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),डी.एन.बी, एल.एल.बी.
कुलसचिव

Dr. Rajendra Shivaji Bangal
M.B.B.S, M.D.( Forensic Medicine), D.N.B, L.L.B.
Registrar

जा.क्र.: मआविवि/वि.क./ १३०५ /२०२५ दि. ११ /०८/२०२५

प्रति,
अधिष्ठाता/प्राचार्य
**विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये**
**मआविवि, नाशिक**

**विषय : "हर घर तिरंगा अभियान" राबविणेबाबत..**

**संदर्भ :** १. विश्वविद्यालय अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचा दि.०८/०८/२०२५ रोजीचा प्राप्त ई-मेल.
२. रासेयो कक्ष, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.रासेयो-२०२५/प्र.क्र.७२/रासेयो कक्ष, दि.०६ ऑगस्ट २०२५.
३. विद्यापीठ पत्र क्र.मआविवि.वि.क./रासेयो/१२४५/२०२५, दि.०६/०८/२०२५.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, **"हर घर तिरंगा"** ही मोहीम आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत सुरु झाली आहे. त्याचा उद्देश सन २०२२ मध्ये भारताच्या स्वातंत्र्य दिनानिमित्त तिरंगा घरी आणणे आणि तो फडकवणे हे आहे. गेल्या काही वर्षात ही मोहीम राष्ट्रीय ओळख आणि अभिमानाची एक यशस्वी जनभागीदारी चळवळ बनली आहे.

सन २०२२ पासून १५ ऑगस्ट रोजी देशभरातील घरे/शासकीय कार्यालये संस्था आणि सार्वजनिक ठिकाणी तिरंगा ठळकपणे फडकवण्यात आला. या भावनेला पुढे भारत सरकारने राष्ट्रीय अंमलबजावणी समितीने मंजुर केलेल्या तीन टप्प्यात २०२५ या वर्षात देशभरात "हर घर तिरंगा" ही मोहिम राबविणेबाबत शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यानुषंगाने पहिला टप्पा २ ते ८ ऑगस्ट पर्यत दुसरा टप्पा ०९ ते १२ ऑगस्ट व तिसरा टप्पा १३ ते १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत आयोजित करणेबाबत उक्त संदर्भीय पत्रान्वये निर्देशित करण्यात आलेले आहे. याबाबत विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालयास संदर्भ क्र.०३ अन्वये अवगत करण्यात आले आहे.

"हर घर तिरंगा" उपक्रम राबविताना भारतीय ध्वजसहिंतेचे पालन होणे आवश्यक असून जाणते अजाणतेपणी राष्ट्रध्वजाचा अवमान होऊ नये याबाबतची दक्षता घेणेविषयी नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात यावी. "हर घर तिरंगा" अभियान संपूर्ण राज्यामध्ये दिनांक ०२ ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत साजरा करण्यात येणार आहे.

सन २०२२ पासून महाराष्ट्र राज्याने या अभियानात नेत्रदीपक कामगिरी केलेली असून यावर्षीही **"हर घर तिरंगा"** हे अभियान **दि.०२ ते १५ ऑगस्ट २०२५** या कालावधीत तीन टप्प्यामध्ये यशस्वीपणे साजरे करण्यासाठी सर्व महाविद्यालयांनी पुढाकार घ्यावा. "हर घर तिरंगा" अभियानांतर्गत कार्यक्रम/उपक्रम साजरे करण्यात यावेत. व त्याचा प्रचार प्रसिध्दी सामाजिक सोशल माध्यमांवर करण्यात यावा.

Inward No. 769
12/08/2025

11-8-25
**कुलसचिव**

website at
टाका

प्रत माहितीस्तव :
१) मा.कुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक.
२) मा.प्रति-कुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक.
३) कुलसचिव कार्यालय, मआविवि, नाशिक.
४) विभागप्रमुख प्रशासन विभाग, मआविवि, नाशिक.